आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक- 27.04.2025 वार- रविवार

---

फडणवीस

महाराष्ट्राची ५० टक्के लोकसंख्या ५०० शहरात आणि उर्वरित लोकसंख्या ४० हजार गावात राहते आहे. शहरांचा चेहरा आपण बदलू शकल्यास ५० टक्के लोकसंख्येला उत्तम जीवन देऊ शकतो. यासाठी 'पुणे अर्बन डायलॉग' सारखं मंथन आवश्यक आहे, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. यशदा, बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट, इंटरनॅशनल सेंटर आणि पुणे महानगरपालिकेद्वारे यशदा इथं आयोजित 'पुणे अर्बन डायलॉग-आव्हाने आणि उपाय' कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा संपूर्ण विकास आराखडा रद्द करून पहिल्यांदा रस्त्यांचे जाळे निर्माण करायचे आणि नगर रचना योजनांचा उपयोग करण्याचा विचार असल्याचं सांगून मुख्यमंत्री म्हणाले की प्रवासाच्या शेवटापर्यंत वाहतुकीची सुविधा मिळाल्याशिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर होत नाही. देशातील शहरांची अवाढव्य वाढ झाल्याने ती बकाल झाली आहेत, घनकचरा, सांडपाणी, पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होते आणि शहरं व्यवस्थापनाच्या बाहेर गेलेली, शाश्वत आणि राहण्यायोग्य राहिली नाहीत हे अचानक लक्षात येतं असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

नागरिकांना पायाभूत सुविधा मिळण्याकरीता मंजूर विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करताना आगामी काळात या त्यात 'अर्बन डिझायनिंग' या संकल्पनेचाही समावेश केला पाहिजे असं नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या.

वेगानं होणाऱ्या शहरीकरणामुळं उद्भवणाऱ्या शहरी समस्यांवर विचारमंथन करणं आणि त्यांचं निराकरण शोधणे हा या परिसंवादाचा उद्देश असल्याचं माजी मुख्य सचिव डॉक्टर

नितीन करीर यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितलं. शहरीकरणाचं अर्थशास्त्र, त्याचे फायदे आणि वाढती लोकसंख्या तसंच पायाभूत सुविधांवरील दबाव यांसारख्या आव्हानांना सामोरे जातांना नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेवर चर्चा करणं हा देखील परिसंवादाचा उद्देश आहे, असंही ते म्हणाले. स.गो. बर्वे पुण्याचे माजी प्रशासक आणि महानगरपालिका आयुक्त होते. गृहनिर्माण आणि प्रशासकीय सुधारणांवरील अहवालांद्वारे त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

परिसंवाद

पाण्याचं जतन केलं तरच पर्यावरणाचा समतोल राखता येतो असं मत पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ डॉक्टर वाय.बी.सोनटक्के यांनी आज पुण्यात एका परिसंवादात व्यक्त केलं. राष्ट्रीय हरित लवाद वकील संघटनेचे अध्यक्ष सौरभ कुलकर्णी यांच्यावतीनं 'पर्यावरणीय उत्तरदायित्व आणि शाश्वतता' या विषयावर हा राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यामध्ये पर्यावरणीय प्रभाव मूल्यांक, राष्ट्रीय हरित लवाद आणि सर्वसमावेशक पर्यावरण प्रदूषण निर्देशांकाबाबत विविध पैलूंवर तज्ज्ञांनी विचार मांडले.

कामबंद

पुणे मार्केट यार्डातील कामगार संघटनेतर्फे दोन मेपासून पुकारण्यात आलेलं काम बंद आंदोलन स्थगित करण्यात आल्याचं पुणे कामगार संघटनेचे अध्यक्ष संतोष नांगरे यांनी सांगितलं. कांदा-बटाटा विभागात येणाऱ्या गोण्या 50 किलोपेक्षा जास्त वजनाच्या असल्यामुळं कामगारांना मणके आणि गुडघ्यांचा त्रास होतो. त्यामुळं पोत्यात फक्त 50 किलो माल भरण्याच्या सूचना करण्याची विनंती 'कामगार संघटने' कडून पणन संचालकांना करण्यात आली. ही सूचना त्यांनी मान्य केली असल्यानं संप मागे घेत असल्याचं नांगरे यांनी सांगितलं.

करिअर

विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील करिअरच्या संधी, खेळाडूंची शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती, क्रीडा शिष्यवृत्त्या, खेळाडूंचे आहार, क्रीडा माध्यमातून नेतृत्व, वेळेचं व्यवस्थापन याबाबत माहिती होण्यासाठी रोटरी क्लब संस्थेतर्फे दोन दिवसांची

कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांनी सर्वोच्च यशासाठी कष्ट आणि त्याग करण्याची आवश्यकता असल्याचं नमूद केलं.
क्रीडा क्षेत्रातील शिष्यवृत्ती आणि करिअरच्या संधी याविषयी इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संस्थापक संचालक डॉक्टर विपुल लुनावत यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

सरुताई

कामगार महिलांच्या जीवनकौशल्य आणि कायदेशीर हक्कांसाठी, त्यांच्या सशक्तीकरणासाठी काम करणारी 'अरुणा संस्था' म्हणजे उपेक्षित समुदायातील महिलांसाठी नवा आशेचा किरण आहे असं मत कवयित्री सरुताई वाघमारे यांनी पुण्यात व्यक्त केलं. अरुणा एज्युकेशन फाऊंडेशनच्या वतीनं 'सक्षमता, सुरक्षितता आणि हक्कांची जाणीव' या विषयावर आयोजित क्षमतावृद्धी कार्यशाळेत त्या बोलत होत्या. अनेक कष्टकरी महिला, कामगार, स्वयंसेवी युवकांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

एआय

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळं येणारा काळ कल्पनेपलीकडील तंत्रज्ञानाचा आणि वेगवान असेल असं मत लेखक आणि तंत्रज्ञानाचे अभ्यासक अच्युत गोडबोले यांनी पुण्यात 'एआयची जादू आणि उद्याचे जग' या विषयावर बोलताना व्यक्त केलं. समवेदना संस्थेच्या २२ व्या वर्धापनदिनानिमित्त गोडबोले बोलत होते.

फुले

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फुल बाजारात फुलांचे दर स्थिर असून अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी माल राखून ठेवला आहे. उद्या-परवा फुलांची आवक वाढणार आहे. त्यामुळं आज बाजारपेठेत फुलांचे दर गेल्या आठवड्याप्रमाणंच टिकून आहेत.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.